**नियमीत दिवाणी दावा क्र. ६५१/२०२३**

रेखाबाई गुलुमकर वि. जिल्हाधिकारी

CNR No. MHSO100014842023

**<u>निशाणी ७१ खालील आदेश</u>**

त्रयस्थ अर्जदाराने त्यांना या दाव्यात सामील करुन घेण्यासाठी अर्ज केला आहे.

२. थोडक्यात अर्ज आहे की, वादीने प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे विरुद्ध निरंतर ताकीदीसाठी व अज्ञात्मक मनाई हुकुमासाठी दावा दाखल केला आहे. त्यामध्ये माळखांबी ते जांबूड सार्वजनिक रस्त्याचे काम गट नं. २५२ व ५९८ या गटामधून करु नये व केलेले काम हुकुमी ताकीदीने काढून टाकणे अशी मागणी केली आहे. तथापी सदरचा रस्ता हा माळखांब ते जांबूड या दोन गावांना जोडणार मुख्य रस्ता असून, तो दोन्ही गावांच्या सिमेवरील रस्ता आहे. सदरचा रस्ता हा पूर्वीपासून अस्तित्वात आहे. तथापी, वादीने खरी वस्तुस्थिती लपवून ठेवून सार्वजनिक रस्त्याचे काम बंद पाडता आले तर पहावे या उद्देशाने सदरचा दावा दाखल केला आहे. त्रयस्थ अर्जदार, विठ्ठलवाडी, माळखांबी व जांबूड या गावातील लोकांना सदर रस्त्याशिवाय दुसरा कोणाताही सोयीचा रस्ता व पर्यायी रस्ता नाही. सदर रस्त्यावरुन शाळेची मुले व इतर वाहतूक पूर्वीपासून आहे. वादीने खरी वस्तुस्थिती लपवून ठेवल्यामुळे, त्रयस्थ अर्जदारांना प्रतिवादी म्हणून सामील करणे आवश्यक आहे. सदरचा रस्ता पुर्वीपासून

अस्तित्वात असल्याबाबत योग्य ते लेखी म्हणणे दिल्याशिवाय व पुरावा दिल्याशिवाय दावा निकाली निघू शकत नाही. म्हणून अर्ज मंजूर करावा.

३. वादीने निशाणी क्र. ७३ वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्रयस्थ अर्जदारांचे संपूर्ण म्हणणे वादीने नाकारले आहे. त्रयस्थ अर्जदारांचा या दाव्याशी कोणताही संबंध येत नाही. त्यांच्या जमिनी वादातील जांबूड–माळखांबी रस्त्याला लागून नाही. त्यांच्या जमिनी रस्त्याखाली जात नाहीत. त्रयस्थ अर्जदाराने अर्ज कलम १ मध्ये लिहील्याप्रमाणे रस्ता नकाशा दर्शविला आहे. दोन्ही गटामध्ये अतिक्रमण करुन अगर मुळ रेखांकनाच्या विरुद्ध जावून कोणत्याही स्वरुपाचे काम प्रतिवादी क्र. ५ यांनी केले नाही अशी विधाने प्रतिवादी क्र. ५ ला फायदेशीर होतील अशी केली आहेत. त्रयस्थ अर्जदाराने कथन केल्याप्रमाणे कागदपत्र अर्जासोबत दाखल करणे गरजेचे होते, पण तसे कागदपत्र व नकाशे दाखल न करता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्रयस्थ अर्जदारांना कागदपत्रे, नकाशे, सर्व्हे नंबरच्या व गटाच्या हद्दीप्रमाणे विठ्ठलवाडी हद्दीतील मंजूर केलेला पूर्वीचा रस्ता याचा नकाशा प्रथम दाखल करण्याचा न्यायालयाने हुकुम करावा. प्रतिवादी क्र. ४ ने रेखांकन रस्त्यावर खोदलेले गटार बुजविण्याचे नोटीस देवून कळविले होते. तसेच रेखांकन रस्त्यावर असलेल्या विहीरीचे खांब व डीपी यामुळे रस्त्याचे कामाला अडथळा निर्माण होणार आहे. तरी सदरील डीपी व विजेचा खांब काढून टाकणेबाबत जिल्हा परिषदेने

विद्युत वितरण कंपनीला नोटीस दिली होती. तरीपण जिल्हा परिषदेने विजेचा खांब व डीपी काढला नाही. त्यामुळे, विठ्ठलवाडीतून असलेला रस्ता वळवून जांबूड हद्दीतून नव्याने करण्याचा प्रयत्न चालू केला आहे. सदरील जुन्या रस्त्याचे दस्ताऐवज दाखल केल्याशिवाय या अर्जाचे काम चालू शकत नाही. माळखांबी–जांबूड हा रस्ता विठ्ठलवाडी हद्दीतून जातो, तो जांबूडवाडी हद्दीतून जात नाही. त्यासंबंधीचे कागदपत्र प्रतिवादीने दाखल केले नाही. त्रयस्थ अर्जदारांना पुढे करुन विनाकारण दाव्यात गुंतागुंत निर्माण प्रतिवादी करु इच्छित आहेत व वादीवर अन्याय करुन नव्याने रस्ता प्रतिवादी तयार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यासाठ त्रयस्थ अर्जदारांचा काही संबंध नाही. म्हणून अर्ज नामंजूर करावा.

४. मी त्रयस्थ अर्जदाराच्या विधिज्ञांचा, वादीचे विधिज्ञांचा व इतर प्रतिवादीचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीने त्रयस्थ अर्जदाराच्या अर्जास पुष्टी दिली आहे.

५. त्रयस्थ अर्जदाराचे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, वादातील रस्ता हा पूर्वापार अस्तित्वात आहे. या रस्त्यावरुन वाहतूक चालू आहे. गावातील मुलं शाळेला याच रस्त्यावरुन जाणे–येणे करतात. त्रयस्थ अर्जदारांना त्यांचे शेतात जाणे–येण्यासाठी याच रस्त्याचा वापर आहे. वादी हा निष्कारण वादग्रस्त रस्त्याचे काम बंद करु इच्छित आहे. त्याने खरी वस्तुस्थिती लपवून ठेवली आहे. म्हणून त्रयस्थ

अर्जदारांची उपस्थिती महत्वाची आहे. याविरुद्ध वादीचे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, वादग्रस्त रस्त्याला लागून अथवा त्या आजुबाजुला त्रयस्थ अर्जदारांची शेती नाही. प्रतिवादी हे मुळ रेखांकनाच्या विरुद्ध जावून नवीन रस्ता तयार करु इच्छित आहेत. त्रयस्थ अर्जदार व प्रतिवादी हे एकमताने काम करतात. त्यामुळे, अर्ज नामंजूर करावा. वादीच्या विधिज्ञांनी आदरणीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे दाखले देतो म्हणून सांगितले. परंतु, दाखल केले नाहीत.

६. प्रतिवादी तर्फे युक्तीवाद केला की, जिल्हा परिषदेचा जो बांधकामाचा नकाशा आहे, त्या नकाशाप्रमाणे प्रतिवादी रस्त्याचे बांधकाम करत आहेत. त्रयस्थ अर्जदाराने या अर्जाला पुष्ट्यी देण्याकरीता त्याचे शेताचे ७/१२ उतारा, कागदपत्राची यादी निशाणी क्र. ७८ सोबत दाखल केले आहे. त्रयस्थ अर्जदार चंदु हनुमंत पाटील, नारायण शंकर निंबाळकर, सुरेश बापू निंबाळकर यांचे नावाच्या जमिनी जांबूड, तालुका माळशिरस या गावामध्ये आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वादीने खरी वस्तुस्थिती दाव्यात नमूद केली नाही. वादी हे जुन्याच रस्त्याची सुधारणा करण्यामध्ये अडथळा करीत आहेत असा त्यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद आहे. वादीच्या या अडथळ्यामुळे शासनाचा आलेली निधी परत जाण्याची शक्यता आहे. म्हणून या अर्जदारांची उपस्थिती त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आवश्यक आहे. वादीचे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, त्रयस्थ अर्जदार हे आवश्यक व गरजेचे पक्षकार नाहीत. त्यांच्या

उपस्थितीशिवाय दावा निकाली होवू शकतो.

७. त्रयस्थ अर्जदारांची जमीन ही जांबूड गावात आहे. वादग्रस्ता रस्त्यानुसार विठ्ठलवाडी व जांबूड या गावचे शिव याबद्दल वाद चालू आहे. त्रयस्थ अर्जदार हे त्यांचे शेतात जाणे–येण्यासाठी वादग्रस्त रस्त्याचा वापर करतात. अशा परिस्थितीत त्रयस्थ अर्जदारांची या दाव्यात उपस्थिती आवश्यक आहे. पण जेव्हा वादग्रस्त रस्त्याचा उपयोग त्रयस्थ अर्जदार करतात, गावातील लोक करतात, अशा परिस्थितीमध्ये, त्रयस्थ अर्जदारांची उपस्थिती या दाव्यात योग्य होईल. हा अर्ज मंजूर केला तर, त्यापासून वादीला काही हानी पोहोचणार नाही. उलट दोन्ही पक्षातील वाद कायमस्वरुपी निकाली निघू शकतो. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतोः–

## आदेश

१. अर्ज मंजूर केला आहे.

२. त्रयस्थ अर्जदार यांना दाव्यात प्रतिवादी क्र. ६ ते १० म्हणून समाविष्ट करण्यात यावेत.

स्थळ – माळशिरस.
दिनांक – २४/०४/२०२३.

**( यु. व्ही. जोशी )**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, माळशिरस.